# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०६ // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि. ०७/१२/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०७/१२/२०१८ शुक्रवार रोजी दुपारी ०१.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | कापसे मयुर चंद्रकांत | खडके सुनिल वामनराव |
| जोहरे प्रिया मधुकर | देशमुख प्रतिभा गजानन | खडके विश्वनाथ सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील विजय पुडलिक | भंगाळे विष्णु रामदास |
| खान रुकसानाबी गबलु | बारी शोभा दिनकर | सोनवणे राखी शामकांत |
| सोनवणे कांचन विकास | शेख हसीनाबी शरीफ | तायडे ज्योती शरद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील कुलभुषण विरभान | लढढा नितीन बालमुकुंद |
| शिंदे गायत्री उत्तम | भिल पार्वताबाई दामु | बरडे नितीन मनोहर |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील उषा संतोष | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सपकाळे मिना धुडकु | कोल्हे ललीत विजय | महाजन सुनिल सुपडू |
| कोळी दत्तात्रय देवराम | राणे गायत्री इंद्रजित | महाजन जयश्री सुनिल |
| सपकाळे रंजना भरत | तायडे सुरेखा नितीन | नाईक प्रशांत सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | चव्हाण ज्योती बाळासाहेब | पटेल इब्राहिम मुसा |
| सनकत चेतन गणेश | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे लताबाई चंद्रकांत |
| सोनवणे भारती कैलास | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी चेतना किशोर | पाटील रेखा चुडामण | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे मुकुंदा भागवत | सोनवणे सुरेखा सुदाम | देशमुख सुन्नाबी राजु |
| काळे अमित पांडुरंग | ढेकळे सदाशिव गणपत | शेख सैईदा युसुफ |
| चौधरी मंगला संजय | पाटील राजेंद्र झिपरु | |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | बालाणी भगतराम रावलमल | |
| सोनवणे धिरज मुरलीधर | अत्तरदे रजनी प्रकाश | **स्विकृत सदस्य** |
| काळे दिपमाला मनोज | काळे रेश्मा कुंदन | सोनवणे कैलास नारायण |
| पाटील सचिन भिमराव | आहुजा मनोज नारायणदास | मराठे राजेंद्र नारायण |
| भोईटे लताबाई रणजीत | पाटील मिनाक्षी गोकुळ | चौधरी महेश रतन |
| पाटील प्रतिभा सुधीर | सोनार रंजना विजय | जैन भागचंद मोतीलाल |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य, **चौधरी मनोज सुरेश, पाटील चंद्रशेखर शिवाजी, कापसे प्रतिभा चंद्रकांत, कोल्हे सिंधु विजय व बेंडाळे उज्वला मोहन** यांचे रजेचे अर्ज आलेले असून ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

श्रध्दांजलीबाबत सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाचे नगरसचिव यांनी वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेता माजी खासदार कै.डॉ.गुणवंतराव रामभाऊ सरोदे, श्रीनिवास कॉलनी येथील रहिवासी स्व.एकनाथ जिवराम चौधरी, जळगांव शहरातील जेष्ठ वकील व प्रेस फोटोग्राफर प्रकाश व प्रेम लिंगायत यांचे वडील कै.अड.आर.एस.लिंगायत यांचे दु:खद निधन. |
| २ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेता माजी खासदार कै.डॉ.गुणवंतराव रामभाऊ सरोदे यांचे दु:खद निधन. |
| ३ | सौ.गायत्री उत्तम शिंदे | प्रभाग क्रं.२ येथील रहिवासी तसेच दै.जनशक्तीचे जेष्ठ पत्रकार कै.राजेंद्र माळी यांचे दु:खद निधन. |
| ४ | सौ.मिनाक्षी गोकुळ पाटील | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेता माजी खासदार कै.डॉ.गुणवंतराव रामभाऊ सरोदे, अयोध्या नगर येथील |

| | | |
|---|---|---|
| | | कै.इंदुबाई हरी महाजन, तसेच कै.सुभद्राबाई गुणाजी वाणी यांचे दु:खद निधन. |
| ५ | डॉ.श्री.विश्वनाथ सुरेश खडके | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेता माजी खासदार कै.डॉ.गुणवंतराव रामभाऊ सरोदे, माजी जेष्ठ नगरसेवक श्री.वामनदादा खडके यांच्या भगिनी व सन्मा.सदस्य श्री.सुनिल वामनराव खडके यांच्या आत्या कै.गं.भा.यशोदाबाई भोळे, जेष्ठ जनरल प्रॅक्टीशनर डॉ.बी.एन.बाविस्कर निमा संघटनेचे सदस्य, यांच्या मातोश्री कै.श्रीमती विजयाबाई बाविस्कर यांचे दु:खद निधन. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या अभिनंदन प्रस्तावाचे अनुषंगाने सभागृहाने ठराव क्र.५७ अन्वये खालील नमूद केलेप्रमाणे ठराव पारित केला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | जळगांव शहरातील शैक्षणिक चळवळीतील अग्रणी व्यक्तिमत्व तसेच दीपस्तंभ फाऊंडेशनचे संचालक प्रा.श्री.यजुर्वेद महाजन यांची प्रतिष्ठेचा ' हेलन केलर पुरस्कारासाठी ' नुकतीच निवड झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील | जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्याबाबत ठराव मांडल्याबद्दल मा.महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३ | सौ.मिनाक्षी गोकुळ पाटील | मराठा समाजाला मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्रजी फडवणीस यांनी १६% आरक्षण मिळवूनय दिलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मान्यवरांची झालेली निवड, त्यांनी विविध सामाजिक कार्य, क्रिडा क्षेत्रात मिळविलेले पुरस्कार, सुयश व अभिष्टचिंतनाबद्दल हे सभागृह उपरोक्त सर्वांचे अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव विषय क्रं.१)** दि.३०/११/२०१८ रोजी तहकूब झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

श्री.भगतराम बालाणी :- मान्य

श्री.प्रशांत सोनवणे :- दि.१६/११/२०१८ च्या पत्रानुसार मुंढे साहेबांचे नाव देणे बाबत काय कार्यवाही केली

श्री.भगतराम बालाणी :- मान्य

श्री.सुरेश पाटील :- मी सुध्दा पत्र दिलेले आहे स्मारक बांधणे साठी

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.३०/११/२०१८ रोजी तहकूब झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- बालाणी भगत रावलमल

अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

**नगरसचिव विषय क्रं.२)** जळगांव शहर महानगरपालिकेस शासना मार्फत मुलभुत सोईसुविधांचा कार्याक्रम अंतर्गत रक्कम रु.५.०० कोटी निधी प्राप्त झालेला आहे. त्याअंतर्गत करावयाच्या विकास कामांना मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.प्रशांत नाईक :- उप सुचना

श्री.भगतराम बालाणी :- कामांचे प्रस्ताव वाचन

श्री.सुनिल महाजन :- या कामामध्ये खाजगी संस्थांचे कंपाउंड केले जात आहे.

श्री.कैलास सोनवणे :- ते कामे होणार नाहीत.

श्रीमती.जयश्री महाजन :- ५ कोटीची कामे आमचा वार्ड यातुन वगळण्यात आला आहे का.

श्रीमती राखी सोनवणे :- वार्ड नं.५ व १५ ला निधी का दिला नाही.

श्री.विष्णु भंगाळे :- वार्ड ५ व १५ का वगळण्यात आला

श्री.सुनिल महाजन :- वार्ड ५ व १५ का वगळण्यात आला

श्री.विष्णु भंगाळे :- आमच्या प्रभागात कामे होणार आहे का.

श्री.भगतराम बालाणी :- मनपा निधीतुन ठेकेदार काम करीत नाही.

श्री.प्रशांत नाईक :- उपसुचनेचे काय झाले

श्री.अश्विन सोनवणे :- १०० कोटींच्या निधीतुन घेण्यात येईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेस मा.अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.मनपा-२१७/प्र.क्र.१७०-अ/न.वि.-१६ नगर विकास विभाग,मुख्य इमारत मंत्रालय मुंबई दि.१६/११/२०१८ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास अंतर्गत रक्कम रु.५.०० कोटी निधी प्राप्त झालेला आहे. सदर निधी अंतर्गत मा.महापौर जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे कडील पत्र क्र.जशमनपा/म.का/३२१/२०१८ दि.०३/११/२०१८ प्राप्त झालेले आहेत. त्यासोबत दिलेल्या कामांच्या यादीनुसार सोबत दिलेल्या परिशिष्ठात नमुद प्रमाणे कामांचे एकुण रक्कम रु.५,००,२२,४००/- मात्रची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेले आहे.

प्रस्तावात दिलेल्या परिशिष्ठात नमुद प्रमाणे कामांचे एकुण रक्कम रु. ५,००,२२,४००/- मात्रच्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत असुन प्रशासनाने सदर कामांना प्रशासकीय मान्यतेकरीता म.जिल्हाधिकारी जळगांव यांची शिफारस होण्यास व सदर प्रस्ताव म.जिल्हाधिकारी जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांचेकडेस पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच परिशिष्टात नमुद दोन कामे ५ कोटी निधीच्या यादीतुन वगळुन म.न.पा.निधीतुन करणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच परिशिष्टातील कामांच्या यादीतील एकुण रक्कम रु.५००२२४००/- इतके खर्च अपेक्षित असुन ५ कोटी निधी पेक्षा जास्त होणारा खर्च रक्कम रु.२२४००/- मात्र म.न.पा. निधीतुन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन निर्णय/आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

बहुमताने मंजुर

अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- १७

सूचक :- बालाणी भगत रावलमल

अनुमोदक :- सोनवणे भारती कैलास

**जळगांव शहर महानगरपालिका मुलभूत सोईसुवधा पुरविणे कामी रुपये 05.00 कोटी निधीची कामे**

**(परिशिष्ठ)**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र.1 मधील महावीर नगर सं.नं.304/1/2 मधील ओपनपेसला कुंपण करणे | 800000/- |
| 2. | प्रभाग क्र.1 मधील स.नं.301/1 व 302/2 मधील ओपनपेसला कुंपण करणे | 1550000/- |
| 3. | प्रभाग क्र.1 मधील मनपा उर्दुशाळा क्र.15 ला कुंपण भित बांधणे | 800000/- |
| 4. | प्रभाग क्र.02 मध्ये आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व 4 ठिकाणी बोअरवेल करणे | 777202/- |
| 5. | प्रभाग क्र.02 मधील कांचननगर,कालंकामाता मंदिराजवळील मनपाची आरक्षित जागा विकसीत करणे व वॉचमन रुम बांधणे | 2500000/- |
| 6. | प्रभाग क्र.03 अंतर्गत स.नं.77/5+77/6 जळगांव शिवार मध्ये WBM रस्ते तयार करणे | 1550000/- |
| 7. | प्रभाग क्र.03 अंतर्गत स.नं.75 जळगांव शिवार या मध्ये WBM रस्ते तयार करणे | 1550000/- |
| 8. | प्रभाग क्र.04 गुरुनानक नगर मधील महिला सार्व.संडाशीजवळील जागेस नविन कंपाऊडवाल बांधणे | 673956/- |
| 9. | प्रभाग.04 गुरुनानक नगर मधील भागात श्री रमेश धवलपुरे ,श्री गंगाराम शिंदे व श्री चांगरे यांचे घराजवळील रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 137602/- |
| 10. | प्रभाग क्र.6 अंतर्गत जळगांव शिवार न.भु.क्र.8641 दत्तकॉलनी येथील खुल्या जागेमध्ये पाथवे तयार करणे | 853992/- |
| 11. | प्रभाग क्र.06 अंतर्गत खांन्देशमिल कॉलनी येथील श्री प्रकाश नाईक यांचे घरापासुन ते डॉ.सहस्त्रबुध्दे यांचे दवाखान्यापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे | 565139/- |
| 12. | प्रभाग क्र.06 अंतर्गत तुकारामवाडी,जानकीनगर व कासमवाडी परिसरात गटारीवर स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 761285/- |
| 13. | प्रभाग क्र.06 अंतर्गत प्रताप नगर येथील खुलीजागा जळगांव न.भु.क्र. 3178 येथे बगिचाखेळणी पुरवीणे | 630725/- |
| 14. | प्रभाग क्र.07 अंतर्गत जळगांव शिवार न.भु.क्र.8308 हनुमान मंदीर येथील खुल्याजागेमध्ये पाथवे तयार करणे | 1041221/- |
| 15. | प्रभाग क्र.07 अंतर्गत पिंप्राळा गट नं.95/1 आर.एम.एस.कॉलनी मधील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे | 408058/- |
| 16. | प्रभाग क्र.07 पिंप्राळा शिवार गट नं.54/2 शिवकॉलनी येथील खुल्याजागेमध्ये चेनलिंक फेन्सींग करणे | 895539/- |

| | | |
|---|---|---|
| 17. | प्रभाग क्र.07 अंतर्गत जळगांव शिवार न.भु.क्र.7670 श्रीनिवास कॉलनी येथील खुल्याजागेमध्ये पाथवे तयार करणे | 816786/- |
| 18. | प्रभाग क्र.07 अंतर्गत जळगांव न.भु.क्र.7863 श्रीकृष्ण कॉलनी येथील खुल्याजागेमध्ये चनलिंक फेन्सींग करणे. | 771936/- |
| 19. | प्रभाग क्र.8 मधील वाघुरधे नगर /बीजे नगर व भोईटेनगर मधील ओपनस्पेसला मध्ये खेळणी व ओपन जिम आयटेम बसविणे | 754988/- |
| 20. | प्रभाग क्र.08 मधील निमखेडी गट नं.115/2 ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे | 1091520/- |
| 21. | प्रभाग क्र.09 मधील अनुपम सोसायटी व शिंदे नगर (पिंप्राळा शिवार ) ओपनस्पेसला चेनलींक फेन्सींग कंपाऊंड करणे | 860309/- |
| 22. | प्रभाग क्र.09 मध्ये पिंप्राळा गट नं.1/2 पांढरी प्लॉट परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे | 755694/- |
| 23. | प्रभाग क्र.09 पिंप्राळा दांडेकर नगर ओपनस्पेस पाण्याचे टाकीला चेनलिंक फेनिंसिंग करणे | 1012782/- |
| 24. | प्रभाग क्र.10 मधील पिंप्राळा गट नं.204/2 मध्ये ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व गेट बसविणे | 638403/- |
| 25. | प्रभाग क्र.10 मधील पिंप्राळा गट नं.198,199 मधील विरसावरकर नगरमध्ये आर.सी.सी.गटार बांधणे | 2500000/- |
| 26. | प्रभाग क्र.11 पिंप्राळा गट नं.199 मुकुंद नगर मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व लोखंडी गेट बसविणे (स्वामी समर्थ केंद्र) | 754128/- |
| 27. | प्रभाग क्र.11 विदयुत कॉलनी पिंप्राळा गट नं.63 मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व गेट बसविणे | 1275976/- |
| 28. | प्रभाग क्र.12 अंतर्गत मेहरुण स.नं.478/1/1 टेलिफोन नगर येथे खुल्याजागेस संरक्षण भिंत बांधणे | 1188005/- |
| 29. | प्रभाग क्र.12 अंतर्गत सन्मीत्र कॉलनी स.नं.479/अ मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व गेट बसविणे | 1089749/- |
| 30. | प्रभाग क्र.12 अंतर्गत मेहरुण स.नं.485/5ब लक्ष्मीनगर मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करुन गेट बसविणे | 643264/- |
| 31. | प्रभाग क्र.12 अंतर्गत पार्वतीनगर स.नं.480/2 मेहरुण मधील खुल्याजागेस चेनलिंग फेन्सींग करणे व लोखंडी गेट बसविणे | 1101653/- |
| 32. | प्रभाग क्र.13 मोहन नगर स.नं.448 ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे | 908902/- |
| 33. | प्रभाग क्र.13 शारदा कॉलन स.नं.447 ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे | 474124/- |
| 34. | प्रभाग क्र.13 मोहन नगर स.नं.449 ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे | 220269/- |
| 35. | प्रभाग क्र.14 आदर्श नगर जुना आरटीओ ऑफिस जवळील स.नं.439 मधील खुल्याजागेस चेनलिंक फेन्सींग करणे | 749265/- |
| 36. | प्रभाग क्र.16 अंतर्गत टी.एम.नगर मधील खुली जागेसे संरक्षण भिंत बांधणे | 3520326/- |
| 37. | प्रभाग क्र.17 अंतर्गत अयोध्यानगर परिसरात ठिकठिकाणी गटारी बांधणे | 30,04,876/- |
| 38. | प्रभाग क्र.18 मेहरुण स.नं.17/4 मधील खुल्या जागेस कुंपणभिंत बांधणे | 1393636/- |
| 39. | प्रभाग क्र.19 मध्ये सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.नं.164 (पी) व 188 (पी) मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 2044659/- |
| 40. | प्रभाग क्र.11 पिंप्राळा गट नं.132 च्या ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल बांधणे | 1236677/- |
| 41. | प्रभाग क्र.11 पिंप्राळा गट नं.152/4/1+2 दत्त डिगंबर सोसायटी मधिल ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे | 640000/- |
| 42. | प्रभाग क्र.10 गट नं.80 टिळकनगर मधिल ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे | 945840/- |
| 43. | वार्ड क्र.14 मेहरुण अंतर्गत स.नं.261मधील खुल्या जागेस कुंपन भिंत बांधणे | 637410/- |
| 44. | वार्ड क्र.14 मेहरुण अंतर्गत स.नं.269/2अ मधील खुल्या जागेस कुंपन भिंत बांधणे | 842170/- |
| 45. | वार्ड क्र.14 मधील आदर्श नगर स.नं.४४४ ओपन स्पेस मध्ये जॉगिंग ट्रॅक बांधणे | 819075/- |
| 46. | वार्ड क्र.13 मध्ये स.नं.452 राकेश नगर ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग करणे | 728815/- |
| 47. | वार्ड क्र.13 मधील नुतनवर्षा कॉलनी मधील स.नं.४४२ ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग करणे | 1106453/- |
| | **एकुण :-** | 50022400/- |

खालील नमुद दोन कामे वरील 5 कोटी निधीच्या यादीतुन वगळुन म.न.पा.निधीतुन करणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच वरील कामांच्या यादीतील एकुण रक्कम रु.50022400/- इतके खर्च अपेक्षित असुन 5 कोटी निधी पेक्षा जास्त होणारा खर्च रक्कम रु.22400/- मात्र म.न.पा. निधीतुन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| प्रभाग क्र.16 अंतर्गत स.नं.507/अ,508/2 दत्तमंदीर, साईबाबा मंदीर खुली जागेला संरक्षण भिंत बांधणे | 2546830/- |
| प्रभाग क्र.16 अंतर्गत स.नं.507/अ,508/2 दत्तमंदीर,साईबाबा मंदीर खुल्याजागेमध्ये पाथवे तयार करणे | 1564106/- |

**नगरसचिव विषय क्रं.३)** कालीकामाता मंदिर ते खोटे नगर बसस्टॉप पर्यंत हायवे समांतर रस्ताचे जागेत येणारे पाईपलाईन व इतर बाबी स्थलांतस्तर करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
श्री.भगतराम बालाणी :- दोन कोटी ऐवजी तीन कोटीची तरतुद करावी

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरा अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ला लगत दोन्ही बाजुस राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत समांतर रस्ते तयार करणेबाबत बऱ्याच दिवसापासुन प्रकरण प्रलंबीत आहे. हायवेवर वेळोवेळी झालेले अपघात तसेच भविष्यात होणारे अपघात कमी करणे बाबत समांतर रस्ता तयार होणे कामी तात्काळ कार्यवाही व्हावी या उद्देशाने समांतर रस्ते कृती समिती मार्फत गेल्या १० दिवसापासुन जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण सुरु आहे. या प्रकरणी निर्णय घेणेकामी समांतर रस्त्याशी संबंधीत सर्व अधिकारी यांचे सोबत मा.खासदार श्री.ए.टी.पाटील, जळगांवचे विदयमान आमदार श्री.सुरेश दामु भोळे, मा.महापौर यांचे समवेत जिल्हाधिकारी कार्यालयात दि.२५/११/२०१८ रोजी सभा आयोजीत करण्यात आलेली होती सदर सभेस मा.आयुक्त, मा.जिल्हापोलीस अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे श्री.सिन्हा साहेब तसेच महाराष्ट्र राज्य विदयुत विभाग कंपनीचे श्री.तडवी साहेब व इतर अधिकारी तसेच समांतर रस्ते कृती समितीचे सदस्य उपस्थित होते. सदर सभेत राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रमुख श्री.सिन्हा साहेब यांनी खालील बाबी उपस्थित केल्यात

१) समांतर रस्त्याचे जागेत म.न.पा.मालकीची पाईप लाईन स्थलांतर करणे :- मा.आयुक्त मनपा यांनी नही विभागाने समांतर रस्त्याच्या मंजुर नकाशा मनपास सादर करावा व त्यानुसार पाईपलाईनचे स्थलांतर करणे कामी मनपा मार्फत सर्व्हेक्षण करण्यात येईल. सदरची बाब आर्थीक स्वरुपाची असल्याने महासभेची मान्यता घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे सुचित केले.

२) समांतर रस्त्यावरील अतिक्रमण काढणे :- या संदर्भात मा.आयुक्त यांनी अतिक्रमण राष्ट्रीय महामार्ग विभागाचे मार्गदर्शनाखालीच काढण्यात येईल तथापी या कामी मनपाचे मशीनरी व मनुषबळ उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासीत केले.

३) समांतर रस्त्याचे जागेतील वृक्ष कटींग करणे :- राष्ट्रीय महामार्ग विभागाने समांतर रस्त्याचे कामात येणारे वृक्षाबाबत सर्व्हेक्षण करुन वन विभागाचे नाहरकत दाखल्यासह वृक्ष तोडणे बाबत रितसर प्रस्ताव मनपाकडे सादर केल्यास त्यानुसार तात्काळ मान्यता देण्यात येईल असे आयुक्त यांनी आश्वासीत केले.

४) समांतर रस्त्याचे जागेत विदयुत पोल व विदयुत वाहिनी स्थलांतरीत करणे :- राष्ट्रीय महामार्ग विभागाने मंजुर नकाशा म.न.पास सादर केल्यास त्यानुसार मनपा मालकीचे विदयुत पोल व वाहिनीचे सर्व्हेक्षण करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे आयुक्त म.न.पा.यांनी मान्य केलेले आहे. तथापी म.रा.वि.कंपनीचे मालकीचे विदयुत वाहिनी व रोहीत्र म.रा.वि.कंपनी मार्फतच स्थलांतरीत करण्यात येतील.

प्रशासनाने प्रस्तावात नमूद केलेनुसार जळगांव शहरा अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ला लगत दोन्ही बाजुस राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत समांतर रस्ते तयार करणे कामी कालीकामाता मंदिर ते खोटे नगर बसस्टॉप पर्यंत हायवे समांतर रस्ताचे जागेत येणारे पाईपलाईन व इतर बाबी स्थलांतस्तर करणे कामी येणारा अंदाजे रक्कम रु.२००/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन निर्णय/आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००
सूचक :- बालाणी भगत रावलमल
अनुमोदक :- खडके विश्वनाथ सुरेश

**नगरसचिव विषय क्रं.४)** आरसीएच अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ५ टक्के मानधनवाढ व १५ टक्के लॉयल्टी बोनस देणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,मा.आयुक्त सो, आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय यांचेकडील दि.०७/१०/२०१७ पत्र क्र. जा.क्र/राआसो/आस्था/वार्षिक मानधनवाढ/६२७११-६३१०८/१७ नुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांच्या वार्षिक मानधन वाढ व लॉयल्टी बोनस देणेबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

तसेच दि.१२ मार्च २०१८ चे पत्रानुसार सुधारीत राष्ट्रीय परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे.

दि.३१/०३/२०१७ रोजी ५ किंवा त्यापेक्षा जास्त वर्ष सलग सेवा झाली आहे त्यांना १५ टक्के लॉयल्टी बोनस व ज्यांची सेवा दि.३१/०३/२०१७ रोजी ३ वर्ष किंवा ५ वर्षापेक्षा कमी सलग सेवा झाली असेल त्यांना १० टक्के लॉयल्टी बोनस अनुज्ञेय आहे.

लॉयल्टी बोनस करीता सेवा कालावधी गणना करतांना त्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती अथवा पुर्ननियुक्ती नंतर त्यास सेवाखंड दिला असला तरी तो सेवा खंडाचा कालावधी वगळुन उर्वरीत प्रत्यक्ष सेवेचा कालावधी केवळ या प्रयोजनासाठी ग्राळय धरावा.

केंद्रशासनाच्या निर्देशानुसार अभियानांतर्गत अधिकारी / कर्मचारी यांना दि.३१ मार्च २०१७ रोजीच्या मानधनावर लॉयल्टी बोनस देय आहे. या बोनसची रक्कम दि. ०१ एप्रिल २०१७ पासुनच्या मानधनात अधिक करुन सदरचे सुधारित मानधन दि.३१ मार्च २०१८ रोजीच्या मानधनावर पुढील वर्षाची मानधन वाढ अधिक करुन नवीन मानधनाची तरतुद प्रस्तावित करावी.

अर्जदार यांनी मागणी केलेनुसार त्यांना लॉयल्टी बोनस लागु करणेस हरकत नसावी असे मत आहे. कारण सदर अधिकारी / कर्मचारी दि. २९ डिसेंबर २०१४ चे परिपत्रकानुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत समायोजित करण्यात आलेले आहे. तथापी जळगांव शहर महानगरपालिका, अंतर्गत आरसीएच अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाची जबाबदारी सध्यास्थितीत मा.महासभा ठराव क्र.२३ दि.२१/०८/२०१४ अन्वये मनपाने स्विकारलेली असल्याने त्यांना दि.३१ मार्च २०१७ रोजीच्या मानधनावर एप्रिल २०१७ पासुन १५ टक्के लॉयल्टी बोनस लागु करुन दि.३१ मार्च २०१८ पर्यंत फरकाची रक्कम अदा करणेस तसेच दि.१२ मार्च २०१८ जा.क्र./राआसो/मनुष्यबळ/लॉयल्टी/११७८९६-११८३६२/२०१८ अन्वये मानधनावर ५ टक्के वेतनवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन निर्णय/आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पोकळे दिलीप बबनराव

अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव

**नगरसचिव विषय क्रं.५)** विकास योजना जळगांव (वा.ह.) मौजे मेहरुण सेक्टर क्र.६ व ७ हद्दी वरील ३०.०० मी रुंद रस्त्याखालील बाधीत असलेले क्षेत्र विनामुल्य महानगरपालिकेस दयावे ही अट शिथील करण्यात यावी या संबंधात कलम ३७ अंतर्गत फेरफार विषयी कार्यवाही करणेबाबत सन्मा.सदस्य अड.श्री.दिलीप बबनराव पोकळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- ३० मीटर रस्त्याबाबतचा प्रस्ताव शासनाने फेटाळला होता न्यायालयीन बाब असतांना जजमेंट आले नंतर प्रस्ताव घ्यावा किंवा त्याची आवश्यकता पडणार नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मंजुर विकास योजनेच्या अधिसुचनेत फेरबदल करुन सदरील ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात प्रचलीत नियमावलीनुसार टी.डी.आर.दिल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान न होता रस्त्याचा व पर्यायाने परिसराचा विकास करणे शक्य होणार आहे. त्या करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये पुन्हा फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पोकळे दिलीप बबनराव

अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु

**नगरसचिव विषय क्रं.६)** जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे प्रागणांत लोह पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धकृती पुतळा बसविणे बाबत सन्मा.महापौर सौ.सिमा सुरेश भोळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सुनिल खडके :- सरदार वल्लभभाई टावर नाव मोठया अक्षरात घ्यावे

श्री.अनंत जोशी :- सरदार वल्लभभाई यांचे स्मारक करावे.

श्री.विष्णु भंगाळे :- सरदार वल्लभभाई यांचा मोठया चौकात पुतळा उभारावा व बहिणाबाई उदयानातील अर्धकृती पुतळा सुशोभिकरण करणे व पुतळा मोठा करणे.

श्री.अनंत जोशी :- गाळयाच्या समितीने काय कार्यवाही केली चालु आहे काय

श्री.नितीन लढढा :- विखंडनाची कारणे काय

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे प्रागणांत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धकृती पुतळा बसविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन निर्णय/आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची तात्काळ पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- खडके सुनिल वामनराव

अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

**नगरसचिव आयत्यावेळेचा विषय क्रं.१)** म.सभापती स्थायी समिती महानगरपालिका,जळगांव यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्रं./सभापती स्थायी समिती कार्यालय/०३/२०१८ दि.०३/११/२०१८ चे पत्रान्वये महानगरपालिकेच्या दैनंदीन कामी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रकारची स्टेशनरीवर उदा.कार्ड फाईल, लेटर हेड मोठे व व लहान, टिप्पणीचे कागद, अदायगीचे देयके, पत्र व्यवहाराचे संपुर्ण कागदपत्रे यावरील जळगांव शहर महानगरपालिका यामधील १७ मजली इमारतीच्या खाली सरदार वल्लभभाई पटेल टॉवर अशी दुरुस्ती होणेबाबत प्रशासनाकडुनआलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.सभापती स्थायी समिती महानगरपालिका,जळगांव यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्रं./सभापती स्थायी समिती कार्यालय/०३/२०१८ दि.०३/११/२०१८ चे पत्रान्वये महानगरपालिकेच्या दैनंदीन कामी वापरण्यात

येणाऱ्या सर्व प्रकारची स्टेशनरीवर उदा.कार्ड फाईल, लेटर हेड मोठे व व लहान, टिप्पणीचे कागद, अदायगीचे देयके, पत्र व्यवहाराचे संपुर्ण कागदपत्रे यावरील जळगांव शहर महानगरपालिका यामधील १७ मजली इमारतीच्या खाली सरदार वल्लभभाई पटेल टॉवर अशी दुरुस्ती होणेबाबत पत्र दिलेले आहे. जळगांव शहर महानगरपालिकेची सर्व छपाई ही भांडार विभागाकडुन केली जात असते. त्यावर जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव त्याखाली मनपाचे फोन व फॅक्स नंबर याप्रमाणे छपाई केली जाते. मात्र मा.सभापती स्थायी समिती यांनी जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हया ठळक अक्षराच्या खाली सदरदार वल्लभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारत महात्मा गांधी रोउ नेहरु चौक,जळगांव पिन नं.४२५००१ अशी दुरुस्ती करणे बाबत कळविले आहे.

तरी मा.सभापती स्थायी समिती मनपा जळगांव यांचे पत्राप्रमाणे यापुढील होणाऱ्या छपाई च्या कागदावर सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारत महात्मा गांधी रोड नेहरु चौक, जळगांव पिन नं.४२५००१ तसेच जळगांव शहर महानगरपालिकेचे ई-मेल jmc.gov.in सुध्दा छपाई करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- बालाणी भगत रावलमल

अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

**नगरसचिव आयत्यावेळेचा विषय क्रं.२)** मेहरुण गावठाण परिसरातील चौकांस नामकरण करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या पत्राचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १५ मेहरुण गावठण परिसरातील महादेव मंदीर ते हॉटेल कस्तुरी या रस्त्यास यापुर्वी स्व.गोपिनाथजी मुंडे असे नामकरण करण्यात आलेले आहे. याचप्रमाणे या परिसरातील तलाठी कार्यालय चौकास संत गाडगे बाबा चौक व साईबाबा मंदीर परिसरातील चौकास स्व.गोपिनाथजी मुंडे चौक असे नामकरण करणे बाबत संबंधीत संपूर्ण परिसरातील नागरीकांची सतत मागणी होत आहे.

करीता मेहरुण गावठण परिसरातील नागरीकांच्या मागणी नुसार **तलाठी कार्यालय चौकास संत गाडगे बाबा चौक** व **साईबाबा मंदीर परिसरातील चौकास स्व.गोपिनाथजी मुंडे चौक** असे नामकरण करणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त नमूद चौकास यापुर्वी कोणतेही नांव दिले आहे किंवा नाही याची खात्री करुन नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- नाईक प्रशांत सुरेश

अनुमोदक :- बालाणी भगत रावलमल

**नगरसचिव आयत्यावेळेचा विषय क्रं.३)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील विशेष रस्ता अनुदान रक्कम रु.३.७५ कोटी अंतर्गत कामांना मंजुरी देणे बाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांनी दिलेल्या पत्राचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील विशेष रस्ता अनुदान रक्कम रु.३.७५ कोटी अंतर्गत सेंन्ट टेरेसा ते सिध्दार्थ नगर पर्यंत मेहरुण तलाव सभोवतालचा ९.०० मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी रक्कम रु.३,४२,४९,०५६/- मात्रच्या अंदाजपत्रकास म.विभागीय आयुक्त नाशिक यांनी त्यांचे कडील पत्र क्र.नपप्र/जमनपा/विरअनु/कार्या/२/१/१६२/२०१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामाचे प्रशासना मार्फत ई निविदा मागविण्यात आलेली आहे. तथापी जळगांव शहरात अमृत पाणी पुरवठा करीता रस्ते खराब झालेले असल्याने वरील काम रद्द करुन नव्याने खाली नमुद १ ते ७ कामे करण्यास व प्रशासकीय मान्यतेकरीता म.जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडेस प्रस्ताव पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत शासकीय औदयोगीक प्रशिक्षण संस्थेच्या पुर्वेकडील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ३४,३४,६४२/- |
| २ | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत पिंप्राळा रेल्वे गेट ते बजरंग बोगदा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५६,७७,६४८/- |
| ३ | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आय.एम.आर.कॉलेज प्रभुदेसाई कॉलनी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,३८,६१,३७१/- |
| ४ | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत हरिष स्वीट मार्ट रिंगरोड ते आय.एम.आर.कॉलेज पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ३०,४८,७४१/- |
| ५ | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत स्टेडिअम ते रिंगरोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५९,९४,७२१/- |
| ६ | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत म्युनिसिपल कॉलनी पाठीमागे मेहरुण स.नं.४८३ प्लॉट नं.१ ते स्नेहल सोसायटी पिंप्राळा गट नंबर १४९/३ प्लॉट नं.०१ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण व कॉक्रीट करणे. | २६,८८,७३७/- |
| ७ | प्रभाग क्रं.१४ अंतर्गत मेहरुण तलावाला लागुन असलेला रस्ता खडीचा करणे. | २८,००,०००/- |
| | | ३,७५,०५,८६०/- |

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- बालाणी भगत रावलमल

अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

**नगरसचिव आयत्यावेळेचा विषय क्रं.४)** मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत सन्मा.सदस्य श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या पत्राचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.सुप्रीम कोर्ट व AWBI च्या निर्देशानुसार मान्यता प्राप्त (AWBI) संस्थेस भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व रॅबीज प्रतीबंधक लस देण्याबाबत विविध मनपांचे योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व अत्यावश्यक असणारे Infrastructure तयार करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणेस व AWBI मान्यता प्राप्त पशुवैदयकीय अधिकारी यांची नेमणुक करुन त्यांच्या मार्गदर्शना खाली भटक्या व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पाटील सचिन भिमराव

अनुमोदक :- बालाणी भगत रावलमल

**नगरसचिव आयत्यावेळेचा विषय क्रं.५)** गट नं.२८ व परिसरात कॉंक्रीट गटार व स्लॅब टाकणे कामी रक्कम रु.७,२८,८१५/- मात्रचा निधी मिळणेबाबत सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या पत्राचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, गट नं.२८ व परिसरात आजपर्यंत कच्च्या गटारी आहेत. सदर भागातील नागरीकांची याबाबत नेहमी पक्क्या गटारी तयार करणेबाबत तक्रारी येत असल्याने गट नं.२८ व परिसरात कॉंक्रीट गटार व स्लॅब टाकणे कामी रक्कम रु.७,२८,८१५/- मात्रचा निधी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- देशमुख प्रतिभा गजानन

अनुमोदक :- बालाणी भगत रावलमल

**नगरसचिव आयत्यावेळेचा विषय क्रं.६)** ना नफा, ना तोटा, तत्वावर महानगरपालिकेअंतर्गत लॅब सुरु करण्यास परवानगी व जागा उपलब्ध करुन देणेबाबत सचिव, ओम साई ग्रामीण प्रतिष्ठाण,औरंगाबाद यांनी दिलेल्या पत्राचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, ओम साई ग्रामीण प्रतिष्ठाण,औरंगाबाद ही नोंदणी कृत संस्था असून संस्थेच्या महिला सभासदांच्या आर्थिक उन्नतीबरोबरच अनेक समाजपयोगी उपक्रमही राबविते. आज ग्रामीण व शहरी भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना खाजगी लॅब्ज मधून विविध वैदयकीय चाचण्यांकरिता जावे लागते. त्यामुळे त्यांचा वैदयकीय खर्च ही वाढतो. परिणामी हा खर्च टाळण्याकरिता हे गरीब रुग्ण वैदयकीय चाचण्या करण्याचेही टाळतात. अशा रुग्णाना मदत व्हावी व समाजाच्या या सेवेत सहभागी होता यावे, या दृष्टीकोनातून संस्थेने विविध जिल्ह्याच्या ठिकाणी लॅब्ज सुरु करुन या रुग्णांना ना नफा, ना तोटा या तत्वावर वैदयकिय चाचण्यांची सेवा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे.

यास्तव सामाजिक सेवेच्या दृष्टिकोनातून आपल्या महानगरपालिकेअंतर्गत आमच्या संस्थेला लॅब सुरु करण्यास परवानगी व जागा उपलब्ध करुन देण्यात यावी अशी ओम साई ग्रामीण प्रतिष्ठाण,औरंगाबाद यांनी केलेल्या मागणीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- बालाणी भगत रावलमल**

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**(भोळे सिमा सुरेश)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**